# मुंबई विद्यापीठ

क्र.आरईजी/आयसीसी/२०२०-२१/३४

**शुद्धीपत्रक :**

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई कल्याण, भिवंडी आणि मीरा-भाईंदर या क्षेत्रातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था यांना असे कळविण्यात येते की, महाविद्यालये १५ फेब्रुवारी २०२१ पासून सुरू करण्याच्या अनुषंगाने आज दिनांक १४ फेब्रुवारी २०२१ ला संध्याकाळी ९.४५ वाजता पाठविलेले परिपत्रक क्रमांक आरइजी/ आयसीसी/२०२०-२१/३२ हे परिपत्रक स्थगित करण्यात येत आहे. सदरील परिपत्रकामध्ये टायफोग्राफीक चूकीमुळे १४ फेब्रुवारी २०२१ ऐवजी १२ फेब्रुवारी २०२१ ही तारीख नजर चुकीने आली आहे. तरी सदरील परिपत्रक स्थगित करण्यात येत आहे.

तसेच जिल्हाधिकारी ठाणे तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण ठाणे, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी सिंधुदुर्ग आणि जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी रत्नागिरी यांच्याकडून नुकतेच आदेश प्राप्त झाले आहेत. तसेच इतर प्राधिकरणाकडूनही असे आदेश लवकरच प्राप्त होतील. त्या अनुषंगाने वेगळी परिपत्रके काढण्यात येत आहेत याची नोंद घ्यावी.

मुंबई – ४०० ०३२
१५ फेब्रुवारी, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रति,

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, उल्हासनगर, ठाणे, नवी मुंबई कल्याण, भिवंडी आणि मीरा-भाईंदर या क्षेत्रातील मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक व मान्यताप्राप्त संस्था